TM

# मिरा भाईंदर महानगरपालिका

कार्यालय:- डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, नगरभवन, मांडली तलाव, भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे-४०११०१, दुरध्वनी क्र. ०२२-२८१९२८२८/२८९३०२८
ई-मेल: mohmbmc4@gmail.com / moh@mbmc.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## सार्वजनिक आरोग्य विभाग

**जा.क्र.मनपा/सार्व.आ.वि./ १६८०/२०२३-२४** **दिनांक:- ३०/१०/२०२३**

### १५ व्या वित्त आयोगांतर्गत नागरी आरोग्य वर्धिनी केंद्र/आपला दवाखाना करीता ठोक मानधनावरील रिक्त पदे भरणेबाबत

### जाहीर सुचना

मिरा भाईंदर महानगरपालिका १५ व्या वित्त आयोगांतर्गत नागरी आरोग्य वर्धिनी केंद्र/आपला दवाखाना करीता निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात करारतत्वावर ठोक मानधनावर खालील नमूद केल्याप्रमाणे रिक्त पदे थेट मुलाखतीद्वारे (Walk In Interview)भरण्यासाठी इच्छुक व पात्र उमेदवारांची निवड करणेकामी अर्ज करण्यासाठी कळविण्यात येत आहेत. खालील संबंधित पदापुढे नमुद केलेली शैक्षणिक अर्हता व पात्रता धारण करणाऱ्या तसेच इतर अटींची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांनी, विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक त्या गुणपत्रके व प्रमाणपत्रांच्या स्व-साक्षांकित प्रतींसह दि.३०/१०/२०२३ ते दि. ०८/११/२०२३ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत सार्वजनिक आरोगय विभाग, **डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, नगरभवन, मांडली तलाव, तळ मजला, भाईंदर** (प.), **ता. जि. ठाणे**-४०११०१ येथे अर्ज सादर करावा. विहित मुदतीनंतर प्राप्त होण्यारे स्वीकरण्यात येणार नाहीत किंवा प्राप्त होणाऱ्या अर्जांचा भरती प्रकियेसाठी विचार केला जाणार नाही.

अर्ज स्वीकारण्याचा पत्ता : **सार्वजनिक आरोगय विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, नगरभवन, मांडली तलाव, तळ मजला, भाईंदर** (प.), **ता. जि. ठाणे**-४०१ १०१.

| अ.क्र. | पदाचे नाव | प्रवर्ग | पद संख्या | शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | मासिक एकत्रित मानधन (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पूर्णवेळ वैद्यकीय अधिकारी MBBS | अनु. जाती | २ | MBBS with MCI Reg./ MMC Reg. | उच्चतम वयोमर्यादा ७० | ८०,०००/- (रु.६०,०००/- शासनामार्फत व रु. २०,०००/- महानगरपालिकेमार्फत) |
| | | अनु. जमाती | १ | | | |
| | | विजा. (अ) | १ | | | |
| | | भ.ज. (ब) | | | | |
| | | भ.ज. (क) | १ | | | |
| | | भ.ज. (ड) | | | | |
| | | वि.मा.प्र. | | | | |
| | | इमाव | ३ | | | |
| | | इ.डब्ल्यू. एस. | २ | | | |
| | | खुला | ५ | | | |
| | | **एकूण** | **१५** | | | |

E:\bharati\New folder\ad 15 fc uhwc 30.10.23.docx

| अ.क्र. | पदाचे नाव | प्रवर्ग | पद संख्या | शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | मासिक एकत्रित मानधन (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | परिचारिका | अनु. जाती | २ | B.sc Nursing / GNM with MNC Registration. | उच्चतम वयोमर्यादा ६५ | रु. २०,०००/- |
| | | अनु. जमाती | १ | | | |
| | | विजा. (अ) | १ | | | |
| | | भ.ज. (ब) | | | | |
| | | भ.ज. (क) | १ | | | |
| | | भ.ज. (ड) | | | | |
| | | वि.मा.प्र. | | | | |
| | | इमाव | ३ | | | |
| | | इ.डब्ल्यू. एस. | २ | | | |
| | | खुला | ५ | | | |
| | | **एकूण** | **१५** | | | |
| ३ | MPW (Male) | अनु. जाती | २ | 12th pass in scince + Paramedical Basic Training Course OR Sanitary Inspector Course | | रु. १८,०००/- |
| | | अनु. जमाती | १ | | | |
| | | विजा. (अ) | १ | | | |
| | | भ.ज. (ब) | | | | |
| | | भ.ज. (क) | १ | | | |
| | | भ.ज. (ड) | | | | |
| | | वि.मा.प्र. | | | | |
| | | इमाव | ३ | | | |
| | | इ.डब्ल्यू. एस. | २ | | | |
| | | खुला | ५ | | | |
| | | **एकूण** | **१५** | | | |

विशेष सुचना –

१. पदांच्या संख्येत व आरक्षणात बदल होण्याची शक्यता आहे.

२. राखीव प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध न झाल्यास इतर प्रवर्गातील उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल. त्यामुळे सर्व प्रवर्गातील उमेदवारांनी मुलाखतीस उपस्थित रहावे.

१५ व्या वित्त आयोगांतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेकरिता रिक्त पदभरतीच्या अनुषंगाने मार्गदर्शक सुचनांनुसार मंजुर पदांपैकी रिक्त पदे भरण्याकरिता जाहिरात http://www.mbmc.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

**१) वयोमर्यादा-**

१. अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिनांकास म्हणजेच दि. ०८/११/२०२३ रोजी उमेदवाराचे वय जाहिरातीत विहित केलेल्या वयोमर्यादेत असणे आवश्यक आहे.

२. मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान मुंबई दि. 25 मे 2019 रोजीच्या पत्रानुसार पदांसाठी पूर्णवेळ वैद्यकीय अधिकारी यांचे वयोमर्यादा 70 वर्ष व रुग्णसेवेशी संबंधित इतर पदांची उदा. परिचारिका, MPW (Male) पदांची वयोमर्यादा 65 वर्ष राहील. वयाच्या 60 किंवा त्यापेक्षा अधिक वयाच्या उमेदवारदांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या

कडून प्राप्त केलेले शारिरीक दृष्ट्या व मानसिक प्रमाणपत्र दृष्ट्या सक्षम असल्याचे अर्जासोबत जोडणे बंधन राहील.

**२) अर्ज भरण्याबाबतच्या सूचना-**

१. उमेदवाराने स्वतः पूर्ण नाव माध्यमिक शाळा प्रमाणपत्राप्रमाणेच अचूकपणे नोंदवावे. अर्जासोबत माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्राची प्रत जोडावी

२. माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाण पत्रामध्ये नमूद जन्म तारीखच अर्जात नमूद करावी.

३. जाहिरात प्रसिध्द केलेल्या दिनांकापर्यंत असणारे उमेदवाराचे वय (दिवस, महिने व वर्ष) अचूक नमुद करावे.

४. अर्जात उमेदवाराचे लिंग या बाबतची माहिती नमूद करावी.

५. अर्ज करीत असणारी अर्जदार विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र तसेच नाव बदल असल्यास राजपत्र (Gazette) अर्जा सोबत करणे आवश्यक आहे.

६. अर्जामध्ये उमेदवाराने स्वतःच्या वैध ई-मेल आयडी/पर्यायी ई-मेल आयडी, चालू भ्रमणध्वनीचा क्रमांक/पर्यायी भ्रमणध्वनीचा क्रमांक नमूद करणे बंधनकारक आहे. पात्र उमेदवारांची यादी उपरोक्त नमूद संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. अर्जात उल्लेख केलेला ई-मेल आयडी पदभरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वेळोवेळी तपासण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

७. उमेदवार महाराष्ट्र राज्याचा अधिवास आहे किंवा कसे हे नमूद करणे आवश्यक आहे. असल्यास त्याबाबतचे विहित प्रमाणपत्र (Domicile Certificate) अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

८. उमेदवाराने आपला जातीचा तपशील अचूकपणे नमूद करावा.

९. अर्जदाराने आपला सध्याचा पत्ता व कायम स्वरुपी पत्ता अर्जामध्ये अचूक नमूद करावा.

१०. अर्जदाराविरुद्ध कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा, याबाबतचे हमी पत्र देण्यात यावे.

**३) अर्ज करण्याच्या अनुषंगाने सुचना -**

१. शैक्षणिक अर्हतेबाबतचा सविस्तर व अचूक तपशील नोंद करावा.

२. अर्ज सादर करावयाच्या शेवटच्या तारखेला उमेदवाराकडे जाहिराती मध्ये नमुद केलेली शैक्षणिक अर्हता असणे आवश्यक आहे.

३. अर्ज भरत असताना अंतिम वर्षाच्या मिळालेले गुण व गुणांची टक्केवारी अचूकपणे नमूद करावी. ग्रेड अथवा अन्य श्रेणी नमूद न करता गुण व गुणांची टक्केवारी नमूद करणे अनिवार्य आहे.

४. अंतिम प्रमाणपत्रामध्ये ग्रेड अथवा श्रेणी नमुद असल्यास संबंधित संस्थेकडून त्याचे गुणांमध्ये संबंधितसंस्थेकडून प्रमाणित करुन घ्यावे.

५. उमेदवारांनी फॉर्ममध्ये नमुद केलेल्या माहितीनुसार अर्जाची छाननी करण्यात येईल.

६. पात्र उमेदवारांनी नियुक्तीच्या दरम्यान आवश्यक शैक्षणिक अर्हतेच्या मूळ गुणपत्रिका व प्रमाणपत्र सादर न केल्यास सदरील उमेदवारांना अपात्र ठरविले जाईल.

७. पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता/पात्रता ही शासकीय मान्यता प्राप्त विद्यापीठातूनच प्राप्त केलेली असणे आवश्यक आहे.

८. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील (ईडब्ल्युएस) उमेदवारांकरीता शासन निर्णयसामान्य प्रशासन विभाग क्र.राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६/अ, दि.१२/०२/२०१९ व दि.३१/०५/२०२१ अन्वये विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**४) अनुभव-**

१. शैक्षणिक अर्हता व आवश्यक अतिरिक्त शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतरचा फक्त शासकीय, निम शासकीय व खाजगी संस्थेचे अनुभव ग्राह्य धरण्यात येईल. त्यानुसार शैक्षणिक अर्हताधारण करण्यापूर्वीच्या अनुभवाची नोंद करण्यात येऊ नये. त्या अनुभवाची परिगणना करण्यात येणार नाही.

२. अनुभवाचा तपशील नमूद करीत असताना ज्या शासकीय, निम शासकीय व खाजगी संस्थेचे अनुभव प्रमाणपत्र प्राप्त आहे. अशाच शासकीय, निम शासकीय व खाजगी संस्थेचा तपशील फॉर्ममध्ये नमूद करावा. अनुभव प्रमाणपत्र नसल्यास सदरचा अनुभव ग्राह्य धरण्यात येणार नाही. अनुभव प्रमाणपत्रामध्ये अनुभवाचा कालावधी सुस्पष्टपणे नमूद असावा.

३. अनुभव प्रमाणपत्रामध्ये तपशील नमूद करताना दिनांक व कार्यमुक्तीचा दिनांक अचूकपणे नमूद करावा. सदर कालावधी अनुभव प्रमाणपत्रानुसारच नोंदविण्याची दक्षता घ्यावी. यामध्ये तफावत आढळल्यास सदर प्रमाणपत्र अवैध ठरविले जाईल.

४. ज्या पदाकरीता अर्ज केला आहे त्या पदाकरीता आवश्यक असलेला अनुभवच ग्राह्य धरण्यात येईल. या व्यतिरिक्त इतर अनुभव असल्यास असा अनुभव विचारात घेतला जाणार नाही.

**५) संगणक अर्हता-**

१. MSCIT प्रमाणपत्र धारण करीत असल्याचा तपशील नमूद करावा.

**६) कुटुंबाचे प्रमाणपत्र-**

१. लहान कुटुंबाची अट दि. 23/07/2020 पासून लागू करण्यात आली असून दि. 23/07/2020 पासून दोन पेक्षा अधिक हयात मुले असणारे उमेदवार राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या पदभरतीसाठी अर्ज करण्यात पात्र ठरणार नाहीत.

२. विहित नमुन्यातील प्रमाणपत्र पात्र उमेदवाराने रूजु होण्या अगोदर सादर करणे अनिवार्य आहे.

**७) उमेदवारांचा फोटो व स्वाक्षरी-**

१. उमेदवाराने फॉर्म वर फोटोकरीता राखीव जागेवर त्याचे अलीकडील काढलेला सुस्पष्ट फोटो चिकटवावा. फोटो स्टेपल करू नये.

२. राखीव जागेत स्वाक्षरी करावी.

**८) निवड प्रक्रिया-**

सदर पदभरतीच्या अनुषंगाने प्राप्त होणा-या उमेदवारांच्या अर्जामधील गुणवत्तेनुसार/गुणांकन पध्दतीने निवड प्रक्रिया राबविण्यात येईल. या संदर्भात सर्व अधिकार मा. अध्यक्ष, निवड समिती यांच्याकडे राखून ठेवले आहेत.

१. उमेदवाराची निवड करावयाची असल्यास शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार गठित करण्यात आलेल्या समिती यांच्या मान्यतेने मा. अतिरिक्त अभियान संचालक, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान मुंबई यांच्या दि.17/03/2022 रोजीच्या पत्रानुसार निकष लावून 13 व 1:5 उमेदवारांची निवड गुणांकन पध्दतीने करण्यात येईल. उमेदवार निवडताना उमेदवाराचे गुणांकन पदवी/पदविका

परीक्षतील अंतिम वर्षाचे गुण अतिरिक्त अर्हता विचारात घेऊन खालील तक्त्यानुसार करण्यात येईल.

**९) थेट मुलाखती :-**

वैद्यकीय अधिकारी (MBBS) हे पद थेट मुलाखती घेऊन भरण्याकरिता खालील गुणांकन पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.

१. Subject Knowledge (10)
२. Research & Academic Knowledge (20)
३. Leadership Quality (10)
४. Administrative Abilities (10)
५. Experience (10)
   a) For Govt. Experience 2 marks for one year
   b) For Private Experience 1 marks for one year
६. Total Experience १० marks maximum
७. एकूण गुण ५०

**१०) गुणांकन पध्दती -**

उपरोक्त थेट मुलाखतीमधील पदांव्यतिरिक्त इतर सर्व पदांकरिता गुणांकन पध्दतीनुसार निवड प्रक्रिया खालीलप्रमाणे राबवावी.

| **विवरण** | **तपशील** | **अधिकतम गुण** |
|---|---|---|
| पदासाठी आवश्यक Qualifying exam मधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे) | मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे 50 प्रमाणे Proportion 50 गुण काढण्यात येतील. (उदा. 60% गुण प्राप्त असल्यास त्याचे 50% प्रमाणे Proportion - 60*50/200-30) | ५० गुण |
| पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबंधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता असल्यास विचारात घ्यावी. | अधिकतम 20 गुण आहेत.<br>मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे 20 प्रमाणे Promotion काढण्यात येतील. (उदा.1 Staff Nurse पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता पूर्ण केलेल्या उमेदवाराने अर्ज केला असल्यास उमेदवारास B.Sc (Nursing) च्या अंतिम वर्षात 60% गुण प्राप्त असल्यास त्याचे 20% प्रमाणे Promotion - 60*20/100=12 गुण) | २० गुण |
| संबंधित पदाशी निगडीत अनुभव | प्रत्येक वर्षासाठी 6 गुण देण्यात येतील. (1 वर्षाकरिता 6 गुण, जास्तीत जास्त 30 गुण) | ३० गुण |
| **एकूण** | | १०० गुण |

१. मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान यांचे जा. क राआसोमं / मनुष्यबळ पदभरती / १०६७०-११०१६/२०२३ दि. २७.०४.२०२३ रोजीचे पत्राद्वारे प्राप्त सुचनांनुसार गुणांकन पद्धतीने पात्र उमेदवारांची करण्यात येईल.
२. गुणानुक्रमानुसार निवड करताना उमेदवारांची प्रवर्ग निहाय गुणांकन यादी (Merit List) तयार करण्यात येणार असून त्यानुसार उमेदवारांना नियुक्ती आदेश Mail द्वारे/ टपालाद्वारे निर्गमित करण्यात येतील.
३. गुणांकन पद्धतीनुसार भरण्यात येणाऱ्या पदांकरिता कोणत्याही प्रकारची मुलाखत घेण्यात येणार नाही.

**११) सर्वसाधारण सुचना –**

१. सदर पदभरती प्रक्रियेबाबतच्या सर्व आवश्यक सुचना व माहिती मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अधिकृतसंकेतस्थळावरच वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल. या करीता उमेदवारांनी http://www.mbmc.gov.in संकेस्थळास भेट देऊन माहिती प्राप्त करुन घेणे अनिवार्य राहील. पदभरतीच्या अनुषंगाने कोणत्याही उमेदवारास वैयक्तिक संपर्क साधण्यात येणार नाही.
२. जाहीरातीत नमूद केलेले पद हे पूर्णतः कंत्राटी स्वरुपाचे असून ते राज्यशासनाचे नियमित पद नाही. या पदाचा राज्यशासनाच्या पदाशी काहीही संबंध नसून उमेदवार राज्यशासनांच्या नियमित पदावर समायोजन करण्यांची मागणी करु शकणार नाही.
३. जाहीरातीत नमूद केलेले पदाचे मानधन हे एकत्रित ठोक मानधन आहे.
४. निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश दिल्यानंतर ७ दिवसांच्या आत मुळ कागदपत्रासह नियुक्तीचे ठिकाणी उपस्थित राहणे बंधनकारक राहील. ( उमेदवाराने अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये व मुळ कागदपत्रांमध्ये पडताळणीच्या वेळीस तफावत आढळल्यास तसेच उमेदवाराने कोणत्याही दबाव तंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रद्द करणेत येईल, अन्यथा त्यांची नियुक्ती आदेश संपुष्टात आणून, प्रतिक्षा यादीतील पुढील उमेदवारांस नियुक्ती देण्यात येईल.

अर्ज भरल्यावर इच्छुक उमेदवारांनी अर्जासोबत खालील आवश्यक व लागू असलेली कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. पूर्णवेळ वैद्यकीय अधिकारी, परिचारिका व MPW (Male) या पदासाठी संकेत स्थळावरील विहित नमुन्यातील अर्ज व त्या संबंधीची कागदपत्रे वरील अटी व शर्तीनुसार मिरा भाईंदर महानगरपालिका, सार्वजनिक आरोगय विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, नगरभवन, मांडली तलाव, तळ मजला, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे-४०१ १०१. (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून) या पत्त्यावर दिनांक ३०/१०/२०२३ ते ०८/११/२०२३ या कालावधीत सकाळी ११.०० ते सायं ५.०० वाजेपर्यंत सादर करावे.

१) पुर्ण माहिती भरलेला फॉर्मची प्रिंट
२) वयाचा पुरावा (जन्म दाखला/शाळा सोडल्याचा दाखला)
३) पदवी/पदविका गुणपत्रिका व प्रमाणपत्र (सर्व वर्षाचे प्रमाणपत्र)
४) कौन्सिल रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र (As Applicable).
५) शासकीय/निमशासकीय / खाजगी संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र कागदपत्रे
६) जातीचा दाखला व जात वैधता प्रमाणपत्र

७) आवश्यकतेनुसार नॉन क्रिमीलेअर

८) अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)

९) आधारकार्ड

१०) पॅन कार्ड

११) सध्याचा फोटो

१२) अर्जदार विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र तसेच नाव बदल असल्यास राजपत्र (Gazette)

१३) वाहन चालविण्याचा परवाना

१४) लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र (प्रतिज्ञापत्र)

१५) फौजदारी गुन्हा दाखल नसल्याचे हमीपत्र

अर्ज व आवश्यक कागदपत्रे एकाच लिफाफयात बंद करुन सादर करावे. सदर लिफाफ्यावर खालीलप्रमाणे तपशिल नमूद करण्यात यावा-

१) महानगरपालिकेचे नाव

२) अर्जदाराचे नाव

३) पदाचे नाव

४) प्रवर्ग

उपरोक्त प्रमाणे लिफाफ्यावर तपशिल नमूद न केलेले अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही.

सदर पदभरती प्रक्रियेत आवश्यकतेनुसार बदल करण्याचे वा सदर पदभरती अंशतः किंवा पूर्ण रद्द करण्याचे अधिकार अध्यक्ष, निवड समितीने राखून ठेवले आहेत.

**(संजय शिंदे)**
**उपायुक्त (सार्व.आरोग्य) तथा अध्यक्ष**
**राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**जाहिरात क्र. : जा.क्र.मनपा/सार्व.आ.वि./ १६८०/२०२३-२४ दि. ३०/१०/२०२३२**

**अर्जाचा नमुना**

**(अर्ज भरण्या अगोदर संपूर्ण जाहिरात वाचा)**

(पदाचे नांव :- ..........................................................................)

प्रति,

मा.आयुक्त तथा प्रशासक,
मिरा भाईंदर महानगरपालिका
स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.)
ता. जि. ठाणे. :- ४०१ १०१.

□□□□

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **(१)** | संपूर्ण नांव | : | मराठी | इंग्रजी (कॅपिटल लेटर) |
| **१.** | **आडनाव** | : | ........................................... | ........................................... |
| **२.** | **स्वत:चे नाव** | : | ........................................... | ........................................... |
| **३.** | **वडिलांचे/ पतीचे नाव** | : | ........................................... | ........................................... |

(२) **पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता (पिन कोडसहित)** : ....................................................................................
....................................................................................
....................................................................................
....................................................................................

**संपर्कासाठी दूरध्वनी/ मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी** :
....................................................................................

(३) **अ) जन्मतारीख** : **तारीख** **महिना** **वर्ष**

**ब) जाहिरात प्रसिध्द झालेल्या दिनांक रोजीचे वय** **..........................वर्ष..........................महिने............दिवस**

**क) वैवाहिक स्थिती** **होय/नाही**

(४) **राष्ट्रीयत्व** : **भारतीय / अभारतीय**

(५) **अर्जदार महाराष्ट्राचा मूळ रहिवासी आहे काय ?** : **होय/नाही**

(६) **जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या संवर्गासाठी लागू असलेल्या चौकटीमध्ये (✓)अशी खुण करावी.**

| अ.जा. | अ.ज | वि.जा.(अ) | भ.ज.ब | भ.ज.क | भज.ड | वि.मा.प्र. | इ.मा.व. | ई डब्ल्युएस | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

(७) **जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या संवर्गासाठी उमेदवाराचा स्वत:चा प्रवर्ग खालीलप्रमाणे लागू असलेल्या चौकटीमध्ये (✓)अशीखूण करावी.**

| अ.जा. | अ.ज | वि.जा.(अ) | भ.ज. ब | भ.ज. क | भज. ड | वि.मा.प्र. | इ.मा.व. | ई डब्ल्युएस | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

(८) **शैक्षणिक अर्हता:**

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेली परीक्षा | मंडळ/विद्यापीठाचे नाव | परीक्षा प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |

(९) **अवगत असणाऱ्या भाषा (योग्य ठिकाणी (✓) अशी खूण करावी.)**

| **मराठी** | **हिंदी** | **इंग्रजी** | **अन्य** |
|---|---|---|---|
| | | | |

(१०) **आपणाविध्द न्यायप्रविष्ट प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगाविषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई चालू आहे काय ?**

| **होय** | **नाही** |
|---|---|
| | |

(११) **अर्जासोबत खालील (छायांकित) सत्यप्रती जोडलेल्या आहेत.**

**१)** ........................... **२)** .............................. **३)** ......................................

**४)** ............................ **५)** .............................. **६)** .......................................

**मी असे प्रमाणित करतो/करते की, वर नमुद केलेली माहिती खरी असुन, ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल आणि माझे विध्द कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.**

ठिकाण :-

दिनांक :- अर्जदाराची सही

**लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र नमुना**

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ मधीलप्रतिज्ञापत्राचा

नमुना-अ

(नियम ४ पाहा)

मी श्री./श्रीमती................................................ श्री................................................ यांचा/ यांची/ मुलगा/ मुलगी/ पत्नी, वय............. वर्षे, राहणार..................................................................... याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

**१)** मी............................................................... या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

**२)** आज रोजी मला............. इतकी हयात मुले आहेत, त्यापैकी **२८** मार्च, **२००५** यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या......आहे. (असल्यास जन्म दिनांक नमुद करावा)

**३)** हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक **२८** मार्च, **२००६** व तद्नंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे.

**ठिकाण** :-

**दिनांक** :-

**अर्जदाराची सही**/-

**फौजदारी गुन्हा दाखल नसले बाबतचे**

**हमीपत्र**

मी. श्री/श्रीम./कुमारी ……………………………………………………………………. वय………… वर्ष. सध्या …..……………………… राहणार असे लिहुन देतो/देते की, या पत्यावर ….. वर्षापासुन आजपर्यंत राहत आहे.

तरी मी वास्तव्य करीत असलेल्या वरील नमूद कालावधीत माझे विरुध्द मी राहत असलेल्या कार्यक्षेत्रातील पोलीस स्टेशनच्या आभिलेखावर काही एक दखलपात्र गुन्हा अथवा आक्षेपार्ह नोंदी नाही.

ठिकाण :-
दिनांक :-

अर्जदाराची सही